# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक -१२ मे २०१५

## राजाबाई टॉवरला मिळाली नवी झळाळी
## आठवड्यातून एकदा हेरिटेज वॉक – डॉ.राजन वेळूकर

मुंबई - देशाच्या आर्थिक राजधानीची शान आणि जागतिक वारसा यादीतही आपली एक स्वतंत्र ओळख असलेल्या मुंबई विद्यापीठाच्या राजाबाई टॉवरला नवी झळाळी मिळाली आहे. एकोणिसाव्या शतकातील जगविख्यात आर्किटेक्ट सर जॉर्ज गिलबर्ट स्कॉट यांच्या कल्पनेतून खास गॉथिक शैलीत साकारलेल्या राजाबाई क्लॉक टॉवर आणि ग्रंथालय या ऐतिहासिक वास्तूच्या जीर्णोद्धाराचा दिमाखदार सोहळा आज मंगळवारी १२ मे रोजी सायंकाळी पार पडला. यावेळी या सोहळ्याला मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.राजन वेळूकर,माजी प्र-कुलगुरु डॉ.नरेश चंद्र,बीसीयुडी संचालक प्राचार्य डॉ.राजपाल हांडे,कुलसचिव डॉ.एम.ए.खान यांच्यासह टीसीएसचे सीईओ आणि एमडी एन.चंद्रशेकरन,इंडियन हेरिटेज सोसायटीच्या अध्यक्षा अनिता गरवारे ,प्रसिध्द वास्तू विशारद वृंदा सोमय्या सह अनेक नामवंत व्यक्ती उपस्थित होते.

या दिमाखदार सोहळ्याच्या प्रसंगी कुलगुरु डॉ.राजन वेळूकर बोलतांना म्हणाले की,या ऐतिहासिक वास्तूचे जिर्णोध्दार करतांना आम्हाला अत्यंत आनंद होत असून ही ऐतिहासिक वास्तू आज पासून खुले करण्यात आले आहे.या ऐतिहासिक आणि भव्य वास्तूचे आठवड्यातून एकदा हेरिटेज वॉक आयोजित केले जाणार आहे.खास करुन विदेशी पर्यटकांच्या पहिल्या पसंतीला उतरणारे राजाबाई क्लॉक टॉवर हे परदेशी पर्यटकांसाठी विशेष हेरिटेज वॉक आयोजित केले जाणार आहे.पुढे बोलतांना ते म्हणाले की,या राजाबाई टॉवरच्या उभारणीमध्ये ज्यांचा सिंहाचा वाटा आहे असे मुंबईतील ख्यातनाम उद्योजक प्रेमचंद रॉयचंद यांच्या नावे गोल्ड मेडल दिले जावे यासाठी असा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात येणार आहे असेही ते म्हणाले.

तर टीसीएसचे एमडी ,एन चंद्रशेकरन बोलतांना म्हणाले की,टीसीएससाठी हा एक ऐतिहासिक क्षण असून राजाबाई क्लॉक टॉवरचा जिर्णोध्दार करतांना ऐतिहासिक वारसा जतन केल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले.तर जगप्रसिध्द या ऐतिहासिक वास्तूच्या दुरुस्तीवेळी त्या काळची गॉथिल शैली जतन करण्याचा पूरेपुर प्रयत्न केला असून प्रत्येक बारकावे पाळण्यात आल्याचे इंडियन हेरिटेज सोसायटीच्या अध्यक्षा अनिता गरवारे यांनी सांगितले.तर या कामासाठी  हेरिटेज आर्किटेक्चर म्हणून ज्यांची नियुक्ती करण्यात आली होती, अशा सोमय्या आणि कलाप च्या वृंदा सोमय्या बोलतांना म्हणाल्या की,मुंबईची शान असलेल्या राजाबाई टॉवरच्या दुरुस्तीवेळी त्या काळची गॉथिक शैली जतन करण्याचा पूर्णपणे प्रयत्न करण्यात आला असून त्याकाळी वापरण्यात आलेल्या टाइल्स तशाच पुन्हा तयार करून वापरण्यात आल्या आहेत. तर ज्या ठिकाणी नक्षी दुभंगली होती तीही हुबेहूब तयार करण्यात आली आहेत. या टॉवरमध्ये असलेल्या लाकडांनाही त्यावेळी देण्यात आलेले रंग आणि पॉलिशही देण्यात आला असून यामुळे हे टॉवर या जीर्णोद्धारामुळे झळाळून निघाले आहे.
मागील एक वर्षापासून या ऐतिहासिक वास्तूच्या जीर्णोद्धाराचे काम सुरु होते. या ऐतिहासिक टॉवरच्या शुशोभिकरणासाठी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसने चार कोटी २० लाख रुपयांची देणगी दिली आहे.  या टॉवरच्या खाली अत्यंत जुने आणि तब्बल चौदाव्या शतकापासूनचे  दुर्मिळ ग्रंथ, हस्तलिखिते, चित्रकृती असलेल्या ग्रंथालयाचाही जीर्णोद्धार करण्यात आला असून अत्यंत सुसज्ज आणि आधुनिक सोयी-सुविधायुक्त असे हे ग्रंथालय

करण्यात आले आहे.
या जीर्णोद्धाराच्या कामासाठी हेरिटेज आर्किटेक्ट सोमय्या ॲण्ड कलाप यांच्या मार्गदर्शनाखालीभवानी कन्स्ट्रक्शन हे काम पूर्ण केले आहे. यासाठी गेली वर्षभर १०० कामगारांची टीम दिवसरात्र मेहनत करीत होती. १८७८ मध्ये हा टॉवर उभारण्यात आला होता. तो २८० फूट उंच आहे. गॉथिक रचनाशैलीच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या टॉवरच्या कामात शैली जतन करण्याची विशेष काळजी घेण्यात आली आहे. वेनेटियन आणि गॉथिक या वास्तुकलेचा मिलाफासह बांधकाम करण्यात आले असून त्यासाठी बेसाल्ट,मलाड,पोरबंदर आणि धरंगधरा या चार प्रजातींच्या दगडांचा वापर करण्यात आला आहे. यावेळी टॉवरच्या डागडुजीत अनेक ठिकाणी स्टेनग्लासचा वापर करण्यात आला आहे.

या ऐतिहासिक वास्तूचे जिर्णोध्दार करतांना स्टोनिंग,वूडवर्क,वॉटर प्रुफिंग,इलेक्ट्रीकल वर्क आणि फायर अलार्म,इंटेरिअर,खिडक्या,दरवाजे,स्टेनड ग्लास इत्यादी बाबींवर विशेष लक्ष देण्यात आले आहे.
मुंबईतील ख्यातनाम उद्योजक प्रेमचंद रॉयचंद यांनी शहरात सर्वात उंच क्लॉक टॉवर उभारला जावा आणि त्याला आपल्या आईचे नाव दिले जावे, या अटीवर हा टॉवर बांधण्यासाठी १८६९मध्ये तीन लाख रुपयांची देणगी दिली होती. त्यांच्या आईचे नाव राजाबाई म्हणून या टॉवरला राजाबाई क्लॉक टॉवर असे नाव दिले गेले. या टॉवरमधील घड्याळाला एक इव्हिनिंग बेल देण्यात आली आहे. राजाबाई या अंध होत्या. त्यांना संध्याकाळ झाल्याचे समजावे, यासाठी ही बेल देण्यात आल्याची इतिहासात नोंद आहे.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)